# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः02.03.2026** **वारःसोमवार**

---

- नागपूर जिल्ह्यात कारखान्यातील स्फोटात १७ जणांचा मृत्यू, १८ जण जखमी; मुख्यमंत्र्यांचे चौकशीचे आदेश
- देशातल्या शीख बांधवांच्या सन्मान आणि न्यायासाठी सरकार कटिबद्ध असल्याची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची ग्वाही
- पश्चिम आशियातील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर तिथल्या भारतीयांसाठी परराष्ट्र मंत्रालयाकडून मार्गदर्शक सूचना जारी
- राज्यात सर्वत्र आज होळीचा उत्साह

आणि

- क्रिकेट टी20 विश्वकरंडक सामन्यांमध्ये भारताची उपांत्य फेरीत धडक

**<u>राऊळगावदुर्घटना</u>**

नागपूर जिल्ह्यात राऊळगाव इथं एका स्फोटकांच्या कारखान्यात स्फोट होऊन १७ जणांचा मृत्यू झाला; तर १८ जण जखमी झाले आहेत. खाणकाम आणि औद्योगिक वापरासाठी स्फोटकं तयार करणाऱ्या कारखान्यात हा स्फोट झाल्याची माहिती स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांनी दिली. जखमींवर नागपूरच्या रुग्णालयात उपचार करण्यात येत आहेत.

या दुर्घटनेतील मृतांच्या वारसांना पाच लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. तसंच या घटनेची सखोल चौकशी करण्याचे आदेशही मुख्यमंत्र्यांनी दिले. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीतून मृतांच्या

कुटुंबांना २ लाख रुपये, तर  जखमींना प्रत्येकी ५० हजार  रुपयांची मदत जाहीर करण्यात आली आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनीही या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे.

**<u>हिंददीचादर</u>**

देशाला सामाजिक एकतेची सर्वाधिक गरज असताना हिंद दि चादर सारख्या कार्यक्रमातून गुरू आणि संतांचा आशीर्वाद आपल्याबरोबर असल्याचा विश्वास मिळतो, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. नवी मुंबईत आयोजित हिंद दि चादर कार्यक्रमात दूरस्थ प्रणालीद्वारे ते काल बोलत होते. सर्व समाजातल्या नागरिकांनी शीख समाजातल्या गुरूंपासून प्रेरणा घेतली, असं सांगून देशातल्या शीख बांधवांच्या सन्मान आणि न्यायासाठी सरकार कटिबद्ध आहे असं मोदी म्हणाले.

शीख धर्मातल्या सर्व १० गुरूंनी धर्म रक्षणाचंच काम केलं. जागतिक पातळीवर या गोष्टी अनुकरणीय असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह या कार्यक्रमात म्हणाले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून गुरू तेग बहादुर यांच्याशी संबंधित विविध समाजांना एकत्र आणल्याबद्दल त्यांनी राज्य सरकारचं कौतुक केलं. महाराष्ट्र आणि पंजाबच्या नात्याबद्दल बोलताना अमित शहा म्हणाले,

या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

राज्यातल्या शालेय अभ्यासक्रमात गुरु तेग बहादुर यांच्या बलिदानावर आधारित धडा समाविष्ट करण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. पंजाब मधील घुमानला देशाच्या पर्यटन नकाशावर आणण्यासाठी सर्व प्रयत्न राज्य सरकार करेल असं आश्वासन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या कार्यक्रमात दिलं.

**<u>अमेरिकाइस्राइलइराणसंघर्ष</u>**

पश्चिम आशियातील तीव्र संघर्षाच्या पार्श्वभूमीवर परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं तिथल्या भारतीयांसाठी मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. भारतीय दूतावास रात्रंदिवस मदतीसाठी उपलब्ध असतील असं त्यात म्हटलं आहे. परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं आणि आखाती देशांमधल्या भारतीय दूतावासांनी आपत्कालिन मदत क्रमांक जाहीर केले आहेत.

पश्चिम आशियातील संघर्षामुळे भारतीय विमान कंपन्यांनी काल साडेतीनशे विमान उड्डाणं रद्द केली. प्रवाशांनी संबंधित विमान कंपन्यांकडून विमान उड्डाणाबाबतची माहिती घ्यावी अशी सूचना विमान उड्डाण मंत्रालयानं केली आहे.

दरम्यान राज्य सरकारनंही या देशांमधे राहणाऱ्या तसंच प्रवासाला गेलेल्या राज्यातल्या नागरिकांच्या सुरक्षेसाठी अत्यावश्यक सूचना जारी केल्या आहेत. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाकडून वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या सूचनांचं पालन करावं असा सल्ला देण्यात आला आहे. राज्य आपत्कालीन कार्यकेंद्र सर्व दिवशी २४ तास सुरु राहणार आहे.

परदेशात अडकलेल्या नागरिकांबाबतच्या माहितीसाठी अथवा आपत्कालीन मदतीसाठी नागरिकांनी १०७७ हा विनाशुल्क मदत क्रमांक, किंवा controlroom@gov.in या इमेलवर संपर्क साधावा असं आवाहन करण्यात आलं आहे.

दरम्यान पुण्यातल्या इंदिरा स्कूल ऑफ बिझनेस स्टडीजचे ८४ विद्यार्थी दुबईतील विमानतळावर अडकून पडले आहेत, मात्र ते सुरक्षित असल्याचं या संस्थेनं स्पष्ट केलं आहे.

**प्रोमो**

**होळी,शिमगा-पीटीसी-सुरेखा**

राज्यात सर्वत्र आज होळी अर्थात शिमग्याचा सण साजरा केला जात आहे. कोकणात शिमग्याचा उत्साह मोठ्या प्रमाणात दिसून येतो. मुंबईकर चाकरमानी शिमग्याला मोठ्या ओढीने आपल्या गावी जातात.

रत्नागिरी जिल्ह्यात शिमगोत्सव फाक पंचमी अर्थात फाल्गुन शिद्ध पंचमीला सुरू होऊन गावोगावच्या प्रथांनुसार गुढीपाडव्यापर्यंत साजरा केला जातो. जिल्ह्यातल्या अनेक गावांमध्ये काल तेरसे शिमगे अर्थात त्रयोदशीला होळीचा मुख्य सण साजरा झाला. आज रत्नागिरी जिल्ह्यात सुमारे तेराशे सार्वजनिक आणि अडीच हजार खासगी होळ्या पेटवल्या जातील.

**मुख्यमंत्रीकॅनडाशिष्टमंडळ**

कॅनडाला महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी अनेक संधी असून कॅनडातल्या शिक्षण संस्था आणि उद्योजकांनी राज्यात गुंतवणूक करावी असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. ते काल मुंबईत कॅनडाच्या शिष्टमंडळाच्या स्वागतासाठी आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलत होते. नवी मुंबईत आंतरराष्ट्रीय ‘एज्युसिटी’ निर्माण करण्यात येत

आहे. या ठिकाणी परदेशातली नामांकित विद्यापीठं आपलं शैक्षणिक दालन उघडणार आहेत, अशी माहिती त्यांनी दिली.

**विश्वमराठीसंमेलन**

राज्यात लागू झालेलं नवीन शैक्षणिक धोरण मराठी मातृभाषेवर आधारित असून शासन मराठीच्या समृद्धीसाठी पावलं उचलत आहे असं उच्च शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी सांगितलं. उच्च शिक्षणावर आधारित असलेले काही अभ्यासक्रम मराठीत सुरू केले असून बीएससी आणि बी.कॉमचे सर्व अभ्यासक्रमही लवकरच मराठी भाषेत सुरू केले जातील, अशी माहिती त्यांनी दिली. विश्व मराठी संमेलनातील परिसंवादात ते काल नाशिकमध्ये बोलत होते.

दरम्यान संमेलनात सकाळच्या सत्रात मराठी भाषेतील युवावर्गाचा सहभाग या विषयावर चर्चासत्र झालं. या चर्चासत्रात विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे आणि अतिरिक्त पोलिस महासंचालक विश्वास नांगरे-पाटील सहभागी झाले होते. जेन झी वापरत असलेली भाषा आता स्वीकारावी लागेल. त्यात संस्कृतीचा अंतर्भाव असावा; मात्र शुद्धतेचा आग्रह धरू नये, त्याचे अवडंबर नको, असं मत चर्चासत्रात व्यक्त करण्यात आलं.

संमेलनाचा समारोप माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या उपस्थितीत झाला. मराठी भाषा, संस्कृती, कला पुढे न्यायची असेल तर राजाश्रय हवा; तरच मराठीची कीर्ती जगभरात पोहोचेल, असं मत गवई यांनी यावेळी व्यक्त केलं. पुढील विश्व मराठी संमेलन नागपूरात घेण्यात येणार असल्याची घोषणा मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी दृकश्राव्य माध्यमाव्दारे कार्यक्रमात सहभागी होऊन केली.

**साखरउत्पादन**

देशातल्या साखर उत्पादनाच्या चालू हंगामात महाराष्ट्र पहिला क्रमांक मिळवेल असा अंदाज इंडियन शुगर अँड बायो-एनर्जी मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनने म्हणजेच इस्माने व्यक्त केला आहे. ‘इस्मा’च्या कार्यकारी समितीच्या पुण्यात नुकत्याच झालेल्या बैठकीनंतर साखर उत्पादनाचा तिसरा सुधारित अंदाज जाहीर करण्यात आला. या हंगामात देशात ३२४ लाख टन साखर उत्पादन होईल आणि त्यात महाराष्ट्राचा वाटा ११८ लाख टन, तर उत्तर प्रदेशचा वाटा ९८ लाख ५० हजार टन असेल असा अंदाज आहे. आतापर्यंत तोडणी झालेल्या उसाचं क्षेत्र, तोडणी राहिलेलं क्षेत्र तसंच, उसाचं उत्पादन, साखरेचा उतारा या गोष्टींवर हा अंदाज आधारित आहे.

**स्वच्छताअभियान**

ज्येष्ठ निरुपणकार डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जयंतिनिमित्त राज्यात विविध ठिकाणी काल डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे स्वच्छता अभियान राबवण्यात आलं. मुंबईत महाराष्ट्र लोकभवन इथं राज्यपालांचे सहसचिव एस. राममूर्ती यांच्या हस्ते या अभियानाचं उद्घाटन झालं.

सोलापूरमधल्या सर्व शासकीय कार्यालयांमध्ये आणि स्मशानभूमीत राबवलेल्या स्वच्छता अभियानात सुमारे अडीच हजार श्री सदस्य सहभागी झाले होते. यामध्ये सुमारे साठ एकर जागेची स्वच्छता करण्यात आली. पुण्यातही काल येरवडा इथल्या रुग्णालयाच्या आवारात स्वच्छता अभियान राबवण्यात आलं.

**रोरोसेवा**

मुंबई-विजयदुर्ग रो-रो जलवाहतूक सेवेचा प्रारंभ काल मुंबईत भाऊचा धक्का इथं सिंधुदुर्गचे पालकमंत्री नितेश राणे यांच्या हस्ते झाला. मुंबईहून निघालेल्या रो-रोची पहिली फेरी काल संध्याकाळी विजयदुर्ग बंदरात दाखल झाली. सुमारे ३५ वर्षांनंतर एखादी प्रवासी बोट विजयदुर्ग बंदरात दाखल झाल्यानं येणाऱ्या प्रवाशांचं स्वागत करण्यासाठी सिंधुदुर्गवासियांनी विजयदुर्ग बंदरावर गर्दी केली होती. ढोलताशांच्या गजरात आणि औक्षण करून रो-रोमधून आलेल्या प्रवाशांचं स्वागत करण्यात आलं.

**म्हैसाळउपसासिंचन**

म्हैसाळ जत विस्तारीत उपसा सिंचन योजनेमुळं दुष्काळी भागातील शेवटच्या टोकापर्यंत पाणी पोहोचणार असून, शेतकऱ्यांचं जीवन सुखकर होणार आहे. या योजनांच्या माध्यमातून दुष्काळी भागाचं नंदनवन होईल असा विश्वास जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे-पाटील यांनी व्यक्त केला. सांगली जिल्ह्यात मिरज तालुक्यातील बेळंकी इथं म्हैसाळ- जत विस्तारित उपसा सिंचन योजनेच्या बोगद्याचं काम पूर्ण झालं; त्यावेळी आयोजित कार्यक्रमात ते काल बोलत होते. ही योजना जत तालुक्याच्या दुष्काळी भागासाठी जीवनदायी ठरणार असून सिंचनक्षेत्रात मोठी वाढ होईल असं विखे पाटील म्हणाले.

**क्रिकेट**

क्रिकेट टी20 विश्वकरंडकाच्या सुपर एट सामन्यात काल भारतानं वेस्ट इंडिजला नमवून उपांत्य फेरीत धडक मारली. अत्यंत चुरशीच्या या सामन्यात वेस्ट इंडिजनं दिलेलं 195 धावांचं आव्हान भारतानं चार चेंडू राखून पार केलं. उपांत्य फेरीत प्रवेश करण्यासाठी भारताला हा सामना जिंकणं आवश्यक होतं.

भारतानं काल नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षण स्वीकारलं. वेस्ट इंडिजनं 20 षटकात 4 गड्यांच्या मोबदल्यात 195 धावा केल्या. जसप्रीत भुम्ब्रानं 2 बळी मिळवले. भारताच्या संजू सॅमसननं केलेल्या नाबाद 97 धावा निर्णायक ठरल्या. त्याला सामनावीर घोषित करण्यात आलं.

भारताचा उपांत्य फेरीचा सामना 5 तारखेला गुरुवारी इंग्लंडबरोबर मुंबईत होणार आहे. उपांत्य फेरीचा दूसरा सामना दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंड यांच्यामध्ये होणार आहे.

**हवामान**

राज्यात सर्वत्र हवामान कोरडं असून त्यात फारसा बदल संभवत नाही. कोकणात तुरळक ठिकाणी हवामान उष्ण आणि दमट राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.**